# ..तुज तेच देती सुखाचे क्षण !

प्रतिनिधी | **नाशिक**

घरीदारी शेतावरी वृक्ष लावी|तयांच्या प्रती नित्य आस्था असावी| जरी वागसी त्या प्रती काळजीने| तुला तेच देती सुखाचे खजिने| या उक्तीचे अनुकरण केले ठक्कर्स इस्टेट यांनी केले. त्र्यंबकरोड परिसरात त्यांनी आपल्याच उद्योग समूहात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षरोपणाचा श्रीगणेशा केला. त्यामुळे त्यांचा हा उपक्रम आगळावेगळा ठरला.

शहरातील ठक्कर्स उद्योग समूहाच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्ताने आयोजित सुवर्ण महोत्सवी समारंभांतर्गत नाशिक परिसरात एक लाख झाडे लावण्याचा संकल्प जाहीर केला होता. त्याचाच एक भाग म्हणून सदरचा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यंदाच्या वर्षात शहर परिसरात ३५ हजार रोपे लागवडीचा उद्देश या समूहाकडून ठेवण्यात आला आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे समूहाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या हस्ते गुलमोहराच्या एका रोपाचे धार्मिक पूजा अर्चनेसह वृक्षारोपण करण्यात आले. या रोपाजवळच संबंधित कर्मचाऱ्याच्या नावाचा फलकदेखील लावण्यात आला आहे. कर्मचाऱ्याची जी जन्मतारीख असेल, त्या प्रत्येक महिन्यातील तारखेला म्हणजेच महिन्यातून किमान एक दिवस त्या कर्मचाऱ्याने आपण स्वतः लावलेल्या रोपाला भेट द्यावी आणि 'हे झाड माझे आहे' अशा आपलेपणाच्या भावनेने त्याची काळजी घ्यावी, असे आवाहन समूहाचे चेअरमन जितुभाई ठक्कर यांनी केले आहे.

या वृक्षारोपण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून क्रेडाईचे माजी अध्यक्ष किरण चव्हाण उपस्थित होते. या वेळी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे संयोजक कक्कड यांचा जितुभाईंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एखाद्या उद्योग समूहाने सामाजिक भावनेतून आपल्या कर्मचाऱ्यांच्या सहभागातून आणि त्यांच्याकडेच श्रेय व जबाबदारी देण्याची ही शहरातील पहिलीच वेळ असावी. यानिमित्ताने पर्यावरण संतुलनाला मोठा हातभार लागणार आहे.

## ठक्कर्स समूहाचा वृक्षारोपण उपक्रम



ठक्कर्स उद्योग समूहाच्या संकल्पपूर्तीअंतर्गत शहर परिसरातील वृक्षलागवड संकल्पाचा श्रीगणेशा करताना क्रेडाईचे माजी अध्यक्ष किरण चव्हाण, समूहाचे चेअरमन जितुभाई ठक्कर आदी.